# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २३/१०/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१०) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक **२३ ऑक्टोबर २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ३.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
2. श्री. मधुकर दामोधर सावंत
3. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
4. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
5. श्री. अ. रशीद खान (मामु)
6. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
7. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
8. श्री. मो. जावेद मो. इसाक
9. श्री. अ. साजेद अ. सत्तार
10. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशीद खान : 54 कोटी रस्त्याचे कामाचे इन्टरनेटवर टेंडर मागणी केली फक्त लोकल वृत्तपत्रात जाहिरात आलेली आहे तीही सात आठ दिवसाची मुदत दिली. सार्व. बांधकाम विभागाच्या नियमानूसार मोठमोठया कामासाठी वाईड पब्लीसिटी व्हायला पाहिजे. जास्त खप असणाऱ्या वर्तमानपत्रात जाहिरात यायला पाहिजे होती. ती आलेली नाही याचे कारण काय खुलासा करावा.

मा.सभापती :अतिरिक्त शहर अभियंता नाहीत, शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता :तीन वृत्तपत्रात व इन्टरनेटवर जाहिरात देतो.

श्री.मो.जावेद मो.इसाक :औरंगाबाद उर्दु डेली न्युज पेपर मध्ये आले की टेंडर भरण्यापूर्वी संगणक बंद पडले होते. यात 30 कोटीचे सिमेंन्ट कॉक्रीटचे रस्ते येतात. संगणक बंद झाल्यानंतर जे टेंडर आले त्यास रिटेंडर का केले नाही. जे भरणार होते ते का थांबलेले होते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : तेथील लाईट बंद करण्यात आली होती असेही वृत्तपत्रात आलेले आहे. पूर्ण टेंडर रिकॉल करावे अशी विनंती आहे.

मा.सभापती : नियमानुसार जर तीन वृत्तपत्रात द्यायला पाहिजे एकाच स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात आली असेल तर कार्यवाही करता येईल.

मा.आयुक्त : कॉम्प्युटर बंद झाले असे म्हणण्याला अर्थ नाही. ठेकेदाराचे कॉम्प्युटर का बंद पडले याचा खुलासा प्रशासन करू शकणार नाही. महापालिकेचे जे कॉम्प्युटर आहे त्याचे वेब सर्वर येथे नाही. ते 24 तास चालू असते. बंद पडण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री.अ.रशिद खान :किती वृत्तपत्रात दिले होते याची माहिती द्यावी, ई टेंडरींग चागंले आहे. मला काम मिळत नाही म्हणून 70/80 टक्के बिलोने टेंडर येत आहे. लोकांनी त्यातूनही धंदे सुरू केले आहे.

मा.आयुक्त :जी काही माहिती वृत्तपत्रात आलेली आहे ती गैरसमजुतीमधून आलेली आहे. महापालिकेचे कॉम्प्युटर बंद होवू शकतच नाही.

श्री.मो.जावेद मो.इसाक : पेपरच्या माहितीनुसार पासवर्ड एक तास अगोदरच बंद झाले होते.

मा. आयुक्त : ठेकेदाराचा स्वत:चा पासवर्ड असेल तो बंद पडलाअसेल तर ती त्याची जबाबदारी आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : किती ठेकेदाराने टेंडर ॲक्सेप्ट केलेले नाही.

मा. सभापती :असे होवू शकत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : असे झालेले आहे. ईटेंडरमध्ये पारदर्शकता खूप असते. ई टेंडर असायला पाहिजे याबद्दल दुमत नाही. परंतू जे 54 कोटीचे कामाचे टेंडर काढले ते रिकॉल करावे मोठे काम आहे तीन ऐवजी सहा वृत्तपत्रात जाहिरात यायला पाहिजे. पुन्हा टेंडर मागवावे.

मा.सभापती : ही पूर्ण कामे स्थायी समिती समोरच येणार आहे. त्यावेळी चर्चा करून सर्वांच्या सम्मतीने निर्णय घेवू. किती पेपरला जाहिरात दिलेली होती माहिती नसेल तर 15 मिनिटाच्या अवधीत सादरकरावी.

श्री.संजय शिरसाट : दीड-दोन महिण्यापूर्वी महानगरपालिकेच्या जमिनीबाबत 1.03 कोटी रक्कम दिली. पीआरकार्ड रद्द झाले. एका व्यक्तीवर म्हणजे त्याचे कुटूंबातील 10 व्यक्तीवर गुन्हे दाखल झाले वसूली दावा दाखल झालेला आहे का, व इतर लोकांवर गुन्हे दाखल केले का, तसेच ज्या अधिका-यांना आपण नोटीसेस दिलेल्या होत्या त्याची उत्तरे आलेली आहेत का?

मा.आयुक्त : विधी विभागाकडून माहिती मिळेल ज्यांचेकडे चार्ज आहे ते उपआयुक्त यांना मा.मुख्यमंत्री यांचे कार्यक्रमासाठी पाठविले आहे. त्यांचा चार्ज दुसरे उपआयुक्त यांचेकडे आहे त्यांना याबद्दल माहिती असेल तर देतील.

श्री.संजय शिरसाट : रक्कम वसुलीचा दावा दाखल झालेला आहे किंवा नाही.

मा.आयुक्त : रक्कम वसुलीचा दावा दाखल करण्यासाठी 15-20 दिवसापूर्वीच आदेशीत केलेले आहे. सर्वांना नोटीसेस दिलेल्या आहेत. शेवटची तारीख 22 दिलेली होती रक्कम वसुली संदर्भात दावा दाखल झाला किंवा नाही तसेच नोटीसेस दिलेल्या पैकी किती लोकांचे खुलासा प्राप्त झालेले आहेत याबाबत संबधीत विभाग प्रमुखच सांगू शकतात.

श्री.संजय शिरसाट : उपआयुक्त उपस्थित नाही याचा अर्थ या बैठकीत ही माहिती मिळणार नाही.

मा.आयुक्त : विधी सल्लागार विभागातील कर्मचारी यांना माहिती असेल त्यांचेकडून घेता येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : तत्कालीन आयुक्त यांनी जे भुसंपादन अधिकारी श्री.सी.आर. निकम त्यांचेही ओपीनीयन घ्यावे त्यांनी या प्रकरणात नमूद केले होते की पूर्ण टायटल क्लिअर आहे. मोबदला दिला पाहिजे. त्याची प्रत मा.आयुक्त साहेबांना दिलेली आहे असे असतांना त्यांना अद्याप साधी कारणे दाखवा नोटीस दिलेली नाही.

मा.आयुक्त : चौकशीमध्ये ज्यांची नावे येतील त्यांना नोटीस दिलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आरोग्य विभागात लायसन्स देण्याच्या 4500 रक्कमेच्या गैरप्रकरणात दोन कर्मचारी यांना निलंबीत करून त्याच दिवशी गुन्हा दाखल केला होता. पुष्पनगरी येथील जमिनीच्या प्रकरणात 1.12 कोटी रूपयांचा गैरव्यवहार झालेला असतांना

पोलीसात गुन्हा का दाखल केलेला नाही. एकास एक न्याय दुस-यास वेगळा न्याय कशासाठी.

मा.आयुक्त : वेगळा न्याय नाही. ज्यांचेवर जबाबदारी फिक्स करू शकलो त्यांचेवर ताबडतोब ॲक्शन घेतलेली आहे. कारणे दाखवा नोटीसेस दिलेल्या असून 22 तारीख घेतलेली होती काल पर्यत किती नोटीसचा खुलासा आलेला आहे याची माहिती संबधीत विभाग प्रमुखच देवू शकतील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मी एक नगरसेवक असून विरोधी पक्ष नेता पण आहे जेंव्हा मी सी.आर. निकम यांची टिप्पणीची प्रत मागविली होती ती देता येत नाही म्हणून मला कळविले. त्यानंतर मी माहितीच्या अधिकारात माहिती घेतली. एक आम नागरीक व लोकप्रतिनिधी यांची किंमत प्रशासनाकडे आहे की नाही.

मा.आयुक्त : कोणत्याही स.सदस्यांनी माहिती विचारली असता त्यांना माहितीच्या अधिकारात मागविण्याची गरज नाही. लगेच माहिती विनामुल्य दिली पाहिजे तसे परीपत्रक काढण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री.गुणवानी यांना 82 लक्ष रूपये हे खाजगी वाटाघाटी करून दिले. भुसंपादन अधिकारी श्री. निकम यांचा अभिप्राय महापालिकेला घेण्याची का गरज भासली. त्यांचे अभिप्राय नुसार जी ही रक्कम दिली त्यामुळे महापालिकेचे नुकसान झालेले आहे. आतापर्यत त्यांचेवर का कार्यवाही केली नाही. महापालिका प्रशासन अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहे काय?

मा.आयुक्त : या प्रकरणाच्या चौकशीमध्ये ज्या लोकांची नावे समोर आली त्यांना कारणेदाखवा नोटीस दिलेल्या आहेत. जे काल विरोधी पक्ष नेता यांनी पत्र दिले त्या संदर्भात चौकशी अधिकारी यांना जे कुणी राहिले असतील त्यांना जबाबदार धरू शकतो का विचारणा करून त्यांना जबाबदार असेल तर त्यांनाही नोटीस देवून कार्यवाही करू यात शंका नाही. जे काही प्रथम दर्शनी दोषी आढळून आले त्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत.

श्री.अ.साजेद अ.सतार : दिनांक 4-7-2006 रोजी र.रू.4500 गैरव्यवहार प्रकरणात श्री.युनूस व तौफिक यांचेवर तात्काळ कार्यवाही करून निलंबीत करण्यात आले. त्याच दिवशी त्यांचेवर पोलीसात गुन्हा दाखल केला. सदर भूखंड प्रकरणात जे दोषी आहेत त्यांचेवर अद्याप का गुन्हा दाखल केलेला नाही.

मा आयुक्त : जे कुणी दोषी असेल त्यांचेविरूध्द प्रशासन कारवाई करणारच आहे.

श्री.संजय सिरसाट : गुणवानी प्रकरणात जे दोषी आहेत त्यांना अभय देण्याचा प्रकार चालू आहे. या प्रकरणाची चौकशी श्री. पानझडे यांचेकडे दिली. त्यांनी चांगला अहवाल दिलेला आहे. यावर आपल्या विधी सल्लागार व मान्यवरानी असा निष्कर्ष काढला की यात गुणवानी दोषी आहे. गुणवानी यांचे कुठे सहया नाही, अधिका-यांनी संचिका पुटअप केलेल्या आहे. तसेच जयराम साळुके यांचेही प्रकरणात मा. जिल्हाधिकारी यांना अर्धशासकीय पत्र देवून महापालिकेचे पैसे गेलेले आहे ते वसूल करून द्यावे म्हणून कळविले. सन 2003 मध्ये लोकशाही दिनाच्या दिवशी मा.जिल्हाधिकारी यांनी निवाडा दिला की या प्रकरणात श्री. कपाळे यांनी सर्व प्रकार घडवून आणला तेच जबाबदार आहे व त्यांचेवर कार्यवाही करण्यासाठी संचालकख नगर रचना, पुणे यांचेकडे प्रस्ताव पाठविणे उचीत वाटते म्हटले होते. त्यात पूढे असे म्हटले की सध्या श्री. कपाले हे सेवानिवृत्त झालेले आहे. कोणताही कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर कमीत कमी सहा महिने त्या विभागास अटॅच असतो. परंतू तो कर्मचारी सन 2003

मध्ये सेवानिवृत्त झाला असेल तर त्यास चार वर्ष होत आहे. या प्रकणात जयराम साळुके व श्री. कपाले यांचेवर गुन्हा दाखल का केलेला नाही. त्यांनी महापालिकेची फसवणूक केलेली आहे. तसेच गुणवाणी प्रकरणात रक्कम वसुलीचा दावा दाखल केला की नाही खूलासा द्यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री.सि. आर. निकम यांनी जो अभिप्राय दिलेला होता त्या संदर्भात अद्याप का ॲक्शन घेतलेली नाही. रू.4500 चे गैर प्रकरणी कर्मचा-यांवर कार्यवाही होवून त्याच दिवशी गुन्हा दाखल होतो तर 1.12 कोटी रू.च्या गैर प्रकाराबाबत जे दोषी आहे त्यांचेवर का कार्यवाही होत नाही. खाजगी वाटाघाटीने संपादनाची कार्यवाही केली होती तर एसएलओचा अभिप्राय का घेतला होता व त्यात ते दोषी असेल तर आतापर्यत कार्यवाही का केलेली नाही. जागा भुसंपादना पोटी महानगरपालिकेने 5.35 कोटी रूपये श्री.सी.आर.निकम यांचे अभिप्राया नुसार दिले सदर जागा अद्याप महापालिकेच्या ताब्यात नाही.

मा.सभापती : रक्कम वसूलीचा दावा दाखल केला की नाही विधी सल्लागार यांनी खूलासा करावा.

विधी सल्लागार : गुणवानी प्रकरणात रक्कम वसुलीचा दावा दाखल करण्यासाठी जी काही कोर्ट फिस भरावी लागते त्यासाठी संचिका लेखा विभगाकडे वर्ग केलेली आहे. मंजूरी मिळाल्यानंतर लगेच कार्यवाही सुरू केली जाईल.

श्री.संजय शिरसाट : कोर्ट फिस साठी संचिका प्रलबीत राहत असेल तर दुर्दैवाची बाब आहे. प्रशासनाला महत्वाचे वाटत नसेल तर वसूली करू नये. यात प्रशासन काही लोकांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे.

मा. आयुक्त : कुणाचीही गय केली जाणार नाही प्रशासन कार्यवाही करीत आहे.

लेखाधिकारी : सदर संचिका चार दिवसापूर्वी उपआयुक्त यांचेकडे पाठविली आहे. लेखा विभागात ती संचिका नाही.

मा.सभापती : उपआयुक्त प्रशासन यांनी सदर संचिका सभागृहात मागवून घ्यावी.

श्री.संजय शिरसाट : गुणवानी यांना 80 लक्ष दिले त्यांचेवर गुन्हा दाखल होईल म्हणून ते न्यायालयात गेले त्यांची बेल झाली नाही. महापालिकेकडून कार्यवाही करण्यास उशीर झाला म्हणून पुन्हा गेल्यावर त्यांना बेल मिळाली. दुसरे जयराम साळुंके तसेच श्री. कपाले हे आरोपी आहे त्यांचेवर गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. काही असले तरी महानगरपालिकेच्या तिजोरीतील 23 लक्ष त्यांनी संगनमताने घेतलेले आहे. हे सिध्द झाले. डीओ लेटर आलेले आहे दोन महिने झाले असे असतांना अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आता संचिका कार्यवाही साठी सादर केली जाते हे दुर्दैव आहे. जेंव्हा गुणवानी कोर्टात जायचे तेंव्हा त्यांची बेल कशी होते नंतर आपण सुटतो असा समज करून काही लोक सुनावणी ऐकण्यासाठी जायचे याची माहिती माझ्याकडे आहे. मा जिल्हाधिकारी यांनी वसुली करण्याचे आदेशीत केलेले आहे श्री.कपाले आता सेवानिवृत्त झालेले असून जयराम साळुंके व श्री.कपाले यांनी मिळून हा प्रकार केला असेल तर त्यांचेवर गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. आजही काहीच कार्यवाही त्यांचेवर नाही, उद्याही होणार नाही. रक्कम वसुलीचा दावा दाखल करण्यास चार महिने लागले तर तोपर्यत कार्यवाही करणार नाही का? महापालिकेचे नुकसान झालेले आहे ही जबाबदारी महापालिकेची आहे महापालिका त्यांस प्रतिवादी करू शकते.

मा.आयुक्त : गुणवानी प्रकरणात वसुली करण्या शिवाय आणखी काय अपेक्षीत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 4500/- रू.साठी कर्मचा-यावर गुन्हा दाखल होतो. 1.12 कोटीचा गैरव्यवहार झालेला असतांना त्या अधिका-यांना का पाठीशी घालीत आहे. या शहराची लोकसंख्या 10 ते 12 लक्ष आहे जे अधिकारी गैरप्रकार करतात त्यांचेवर कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे. जे दोषी आहे त्यांचेवर अद्याप काहीच कार्यवाही केली नाही.

मा.आयुक्त : पूर्वीच्या रिपोर्ट मध्ये ज्यांची नावे आलेली आहे त्या सर्वांना नोटीसेस दिलेल्या आहे. जे कुणी दोषी निघेल त्यांना नोटीस दिल्या जातील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 4500/- रू.च्या गैरप्रकरणात आरोग्य विभागातील दोन कर्मच-यांना तात्काळ निलंबन व त्याच दिवशी पोलीसात गुन्हा दाखल होतो. 1.12 कोटीच्या प्रकरणात जे दोषी अधिकारी आहे, मनपाच्या तिजोरीतील 80 लक्ष रू.दिले जाते त्यांना प्रशासन साधी नोटीस देत नाही हे योग्य नाही.

श्री.अ.रशिद खान : कोणत्या तीन वृत्तपत्रातात 54 कोटीच्या कामाची जाहीरात दिलेली होती त्याची झेरॉक्स प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.

मा. सभापती : याची एक प्रत सर्व सदस्यांना देण्याची व्यवस्था करावी.

श्री.संजय शिरसाट : जयराम साळुंके तसेच श्री.कपाळे यांनी महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे त्याना एक नोटीस दिली त्यांचेवर गुन्हा दाखल करायला पाहिजे होता असे माझे मत आहे.

मा.सभापती : प्रशासन याची माहिती घेत आहे तोपर्यंत विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

**विषय क्र. 149 :**

दिनांक **31/7/2007** रोजीची तहकूब व दि.**7/8/2007** रोजी संपन्न झालेली (का.प.क्र.6), दि.**7/8/2007**(का.प.क्र.7) आणि दि. **4/9/2007**(का.प.क्र.8) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

डॉ.आशा बिनवडे : या विषयात माहिती बैठकीत मी आरक्षण क्र 227, 228 च्या संदर्भात माहिती विचारलेली होती अद्याप कार्यवाही केली नाही.

मा.आयुक्त : या संदर्भात माझ्या दालनात बैठक बोलवून लगेच निर्णय घेतला जाईल.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी या विषयी तात्काळ निर्णय घ्यावा. दि.7/8/2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभा (का.प.क्र.7) ठराव क्र.85 मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

"स्थायी समिती सभा दि.7/8/2007 ठराव क्र.85 या ठरावात नमुद अ.क्र.1 ते 6 च्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना मिळणारा **(शेवटचा पगार वजा सध्याचे निवृत्ती वेतन)** इतके प्रतिमहा वेतन अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच कार्यालयीन खर्च, आवश्यक साहित्य(स्टेशनरी, बिल्डींग, फोन, प्रवास इत्यादी व किरकोळ खर्च) पीआर कार्ड, 7/12 उतारा यांच्या प्रती काढणे, मोजणी नकाशा, नगर भूमापन नकाशा मिळविणे, आवश्यकता भासल्यास भूमी अभिलेख/नगर भूमापन कार्यालय यांच्याकडे शुल्क जमा करणे इत्यादी सर्व कामांसाठी रू.15,000/- प्रती महिना खर्चाच्या रक्कमेस मंजुरी देण्यात येते. "

या दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

"स्थायी समिती सभा दि.7/8/2007 ठराव क्र.85 या ठरावात नमुद अ.क्र.1 ते 6 च्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना मिळणारा **(शेवटचा पगार वजा सध्याचे निवृत्ती वेतन)** इतके प्रतिमहा वेतन अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच कार्यालयीन खर्च, आवश्यक साहित्य(स्टेशनरी, बिल्डींग, फोन, प्रवास इत्यादी व

किरकोळ खर्च) पीआर कार्ड, 7/12 उतारा यांच्या प्रती काढणे, मोजणी नकाशा, नगर भूमापन नकाशा मिळविणे, आवश्यकता भासल्यास भूमी अभिलेख/नगर भूमापन कार्यालय यांच्याकडे शुल्क जमा करणे इत्यादी सर्व कामांसाठी रू.15,000/- प्रती महिना खर्चाच्या रक्कमेस मंजुरी देण्यात येते. " या दुरूस्तीसह दिनांक **31/7/2007** रोजीची तहकूब व दि.**7/8/2007** रोजी संपन्न झालेली, दि.**7/8/2007** आणि दि. **4/9/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 150 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.59 अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे बाबतच्या कामासाठी जिल्हा दरसुची 2006-07 नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.15.00 लक्षचे तयार करण्यात आले असुन त्यास दि.1.9.2007 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षका अंतर्गत पान क्र.124 व 122 अनुक्रमांक 39, 40, 13, 10 नुसार 15.00 लक्षची तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.15.00 लक्ष मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.59 अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.15.00 लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 151 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.91 अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी जिल्हा दरसुची 2006-07 नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.11.03 लक्ष चे तयार करण्यात आले असुन त्यास दि.1.9.07 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षका अंतर्गत पान क्र.122 अनुक्रमांक 6 व 41 नुसार 11.00 लक्ष ची तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.11.03 मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.91 अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,03,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 152 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.25 अयोध्यानगर येथे विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.16,83,300/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नवीन काँक्रीट रस्ते(शहर) या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 1931 मी. व रूंदी सरासरी 2 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी सदर कामासाठी रू.16,83,300/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.25 अयोध्यानगर येथे विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,83,300/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 153 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.94 अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी जिल्हा दरसुची 2006-07 नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.16,70,000/- चे तयार करण्यात आले असुन त्यास दि.1.8.07 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षका अंतर्गत पान क्र.118 व 123 अनुक्रमांक 17, 18, 21, 22 व 19 नुसार एकुण रू.17.00 लक्ष ची तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.16,70,000/- मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.94 अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,70,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 154 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, शहरातील विविध रस्त्यांवर चौकात साईन बोर्ड लावणे, झेब्रा क्रॉसिंग व लेन मार्कींग करणे (विभाग 4, 5, 6) या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.17,74,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात वाहतूक संकेतांक या लेखा शिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तरी रक्कम रू.17,74,000/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध रस्त्यांवर चौकात साईन बोर्ड लावणे, झेब्रा क्रॉसिंग व लेन मार्कींग करणे (विभाग 4, 5, 6) या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,74,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 155 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, उस्मानपुरा भागात विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,99,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेलाआहे.

तरी रक्कम रू.14,99,500/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा भागात विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,99,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 156 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.70 विद्यानगर सारंग सोसायटी ते हिंदुराष्ट्र 50' डी.पी. रोडचे पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.13,96,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तरी रक्कम रू.13,96,500/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.70 विद्यानगर सारंग सोसायटी ते हिंदुराष्ट्र 50' डी.पी. रोडचे पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,96,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 157 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.15 मधील एन-12 डी सेक्टर मधील विविध ठिकाणच्या खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.10,98,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत अनु.क्र.13 ते 18 मधील तरतुदी मधून करण्यात येणार आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रू.10,98,000/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.15 मधील एन-12 डी सेक्टर मधील विविध ठिकाणच्या खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.10,98,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 158 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.3 यादवनगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.16,86,000/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 1055 मी. व रूंदी सरासरी 6 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.16,86,000/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.3 यादवनगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,86,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 159 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, आरोग्य विभागामार्फत रूग्णांना इंजेक्शन ए.आर.व्ही.(अँटी रेबीज व्हॅक्सीन) उपलब्ध करून देण्यासाठी सन 2007-08 वर्षाच्या अंदाजपत्रकात रोग प्रतिबंधक विभाग लस खरेदी संकेतांक क्र.आरई-282 या लेखाशिर्षा अंतर्गत रू.7.00 लक्ष तरतुद ठेवण्यात आली होती.

निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लस पुरवठ्याचे गांभीर्य व निकड लक्षात घेऊन 1499 व्हॉईल कलम 67 अंतर्गत खरेदी करण्यात आले होते. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सर्वात कमी दरात पुरवठा करणारे मे.इम्पॅक्ट बायोफार्म प्रा.लि. यांच्याकडून (रू.218/- प्रति व्हॉईल) या दराने 2182 व्हॉईल खरेदी करण्यात आल्या होत्या.

लस खरेदी या लेखाशिर्षातील आर्थिक तरतुद संपलेली असल्यामुळे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया औषधी खरेदी संकेतांक क्र.आरई-253 या लेखाशिर्षातील रू.4.00 लक्ष तरतूद ही लस खरेदी करण्या करीता वापरण्याच्या/उपयोगात आणण्याच्या मंजुरीस्तव तसेच संपुर्ण खरेदीसाठी लागणारा रूपये 11.00 लक्षच्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य विभागामार्फत रूग्णांना इंजेक्शन अे.आर.व्ही.(अँटी रेबीज व्हॅक्सीन) उपलब्ध करून देण्यासाठी, लस खरेदी या लेखाशिर्षातील आर्थिक तरतुद संपलेली असल्यामुळे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया औषधी खरेदी संकेतांक क्र.आरई-253 या लेखाशिर्षातील रू.4.00 लक्ष तरतूद ही लस खरेदी करण्याकरीता वापरण्यास तसेच संपुर्ण खरेदीसाठी लागणारा रूपये 11.00 लक्षच्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 160 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. 79 मुकूंदवाडी येथील महानगरपालिकेच्या प्रा. शाळेवर पहिला मजला बांधणेकरिता सा. बां. विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रूपये 15.00 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी मा. स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरिल कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत विकास इमारती, शाळा, दवाखाने या लेखाशिर्षकातून मा. सर्वसाधारण सभा विषय क्रं. 876 दिनांक 20.6.2007 अन्वये वळती तरतुदीनुसार करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.15.00 लक्ष चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. 79 मुकूंदवाडी येथील महानगरपालिकेच्या प्रा. शाळेवर पहिला मजला बांधणेकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.15,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 161 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.59 अंतर्गत मो.खोकडपुरा व रोकडा हनुमान कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी जिल्हा दरसुची 2006-07 नुसार रक्कम रू.10.92 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दि.10.9.2007 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये पुनःर्डांबरीकरण शहरी भाग या लेखा शिर्षका अंतर्गतपान क्र.117 अनु.क्र.8 नुसार 11.00 लक्ष ची तरतुद उपलब्ध आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रू.10.92 लक्ष चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.59 अंतर्गत मो.खोकडपुरा व रोकडा हनुमान कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,92,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 162 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.58 अंतर्गत कैलासनगर येथील बग्गा इंजिनिअरींग ते स्मशान मारूती रस्त्यांचे पुनःर्डांबरीकरण करणे बाबत कामासाठी जिल्हा दरसुची 2006-07 नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.16,00,000/- चे तयार करण्यात आले असून त्यास दि.1.9.2007 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षा अंतर्गत पान क्र.118 अनुक्रमांक 15 नुसार रू.16.00 लक्ष ची तुरतुद उपलब्ध आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.16,00,000/- मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.58 अंतर्गत कैलासनगर येथील बग्गा इंजिनिअरींग ते स्मशान मारूती रस्त्यांचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,00,000/- च्या अंदाजपत्रकास सवानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 163 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.66 शिवशंकर कॉलनी प्रभागातील विश्वभारती कॉलनी, रविंद्रनगर, टिळकनगर येथे रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,94,471/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च खालील प्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

प्रभाग फ अर्थसंकल्प 2007-08 मधील पृष्ठ क्र.163 वरील अ.क्र.10, 15 व 16 या कामासाठी उपलब्ध तरतुद (5.00 + 5.00 + 5.00) = 15.00 लक्ष. सदरील काम वॉर्ड क्र.66 विश्वभारती कॉलनी, रविंद्रनगर, टिळकनगर येथे रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.66 शिवशंकर कॉलनी प्रभागातील विश्वभारती कॉलनी, रविंद्रनगर, टिळकनगर येथे रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. 14,94,471/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 164 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.51 मो.इंदिरानगर स्लम भागात गल्ली नं.29 ते 33 इंदिरा प्राथमिक शाळे समोरील रस्त्यालगत प्रिकास्ट आरसीसी 450 मीमी अर्धगोलाकार सरफेस गटार बांधणे, त्यावर प्रिकास्ट चौकोनी ढापे बसविणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अं.प.रक्कम रू.12,93,000/- होत आहे. सदरील काम सन 2007-08 अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष स्लम भागात खुल्या गारी बांधणे अंतर्गत पृष्ठ क्र.W182 वरील अ.क्र.6 प्रमाणे 5.00 लक्ष व पृष्ठ क्र.W210 वरील अ.क्र.15 वरील 8.00 लक्ष अशी एकूण 13.00 लक्ष मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1040 दि.2.8.2007 अन्वये बदलण्यात आलेल्या लेखाशिर्ष शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अंतर्गत प्रस्तावत आहे. मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवण्यासाठी मा.आयुक्त यांची दि.13/9/2007 ची मान्यता आहे. करीता रक्कम रू.12,93,000/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.51 मो.इंदिरानगर स्लम भागात गल्ली नं.29 ते 33 इंदिरा प्राथमिक शाळे समोरील रस्त्यालगत प्रिकास्ट आरसीसी 450 मीमी अर्धगोलाकार सरफेस गटार बांधणे, त्यावर प्रिकास्ट चौकोनी ढापे बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,93,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 165 :**

कार्यकारी अभियंता(विद्रेइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.73 मधील सिडको एन-2 येथील सार्वजनिक सभागृह, दिशा नभांगण लगतच्या रस्ता, ज्ञानेश शाळेजवळील मैदान व एन-2 क्रिकेट स्टेडीयम यांचे नामकरण फलक बसविणे व उद्घाटन करणे इ. कामासाठी सा.बां.खात्याचे सन 2006-07 चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.1,36,882/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम तातडीने करून घेणे असल्याने मा.आयुक्त यांनी मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)2 अन्वये उपलब्ध गुत्तेदार श्री.अब्दुल हसीब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेसाठी दि.12/9/2007 अन्वये मंजुरी दिली आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रू.1,36,882/- चे अंदाजपत्रक व सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री.अ.हसीब यांचेकडून मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)2 अन्वये करून घेणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च इमारत देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षकातून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.73 मधील सिडको एन-2 येथील सार्वजनिक सभागृह, दिशा नभांगण लगतच्या रस्ता, ज्ञानेश शाळेजवळील मैदान व एन-2 क्रिकेट स्टेडीयम यांचे नामकरण फलक बसविणे व उद्घाटन करणे इ. कामासाठी र.रू.1,36,882/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री.अ.हसीब यांचेकडून मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)2 अन्वये करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 166 :**

1. मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद, पोलीस कंट्रोल रूम औरंगाबाद यांच्या पत्र क्र.पोउपआ/वाचक/पत्र/07/3138, दि.22.6.2007 नुसार औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिकेच्या हद्दीत मागील तीन वर्षात पोलीस दलास खालील प्रमाणे बेवारस प्रेतांचे कॉल्स मिळाले आहेत.
   - सन 2005 मध्ये 51 कॉल्स प्राप्त.
   - सन 2006 मध्ये 45 कॉल्स प्राप्त.
   - सन 2007 मध्ये 32 कॉल्स प्राप्त.
   - एकूण 128 कॉल्स प्राप्त झाले. म्हणजेच प्रतिवर्षी पोलीस दलास सरासरी 42.66 बेवारस प्रेतांचे कॉल्स प्राप्त झाले.
2. एका बेवारस प्रेताचे अंत्यसंस्कार करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | लागणाऱ्या वस्तू | खर्च रू. |
|---|---|---|
| 1. | लाकूड 5 क्विंटल | 1,000/- |
| 2. | कापड | 500/- |
| 3. | शववाहिनी/वाहन चालक | 500/- |
| 4. | रॉकेल, गोवरी व इतर साहित्य | 200/- |
| 5. | फोन/24 तास ठेवणे | 500/- |
| 6. | इतर खर्च | 300/- |
| | **एकूण ..** | **3,000/-** |

3. मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेने बेवारस प्रेताच्या अंत्यसंस्कारासाठी दैनिक वर्तमान पत्राद्वारे जाहीर आवाहन देऊन शहरातील बचत गटांना अर्ज करण्याचे सुचविले होते. त्यानुसार अग्निशमन दलास 11 बचत गटांचे व 01 सुशिक्षीत बेरोजगार संस्थेचे असे एकूण 12 अर्ज प्राप्त झाले. पैकी पाच बचत गटांना अंतीम चर्चेसाठी मा.आयुक्तांनी बोलावले व शिक्षणाधिकारी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथे मुख्य अग्निशमन अधिकारी, प्रकल्प संचालक यांच्या समोर सोडत पध्दतीने **"पंचशील महिला बचत गटाची"** निवड करण्यात आली. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिली.

4. करीता पंचशील महिला बचत गट, जयभीमनगर, घाटी, औरंगाबाद या गटास औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आढळणाऱ्या बेवारस प्रेतांच्या अंत्यसंस्काराचे काम दिल्यास, प्रत्येक कॅलेंडर महिन्यात एक ते पाच पर्यंत बेवारस प्रेतांचे अंत्यसंस्कार करण्यासाठी रू.15,000/-(रूपये पंधरा हजार फक्त) खर्च होणार आहे. जर एका कॅलेंडर महिन्यात पाच पेक्षा जास्त बेवारस प्रेतांचे कॉल प्राप्त झाल्यास अंत्यसंस्कार करण्यासाठी प्रती बेवारस प्रेत रू.3000/- खर्च देण्यात येणार आहे.

संभाव्य वार्षिक खर्च खालील प्रमाणे

❖ एका वर्षासाठी संभाव्य खर्च रू. - 1,80,000/-

❖ पाच वर्षासाठी संभाव्य खर्च - 9,00,000/-

उपरोक्त प्रस्ताव 5 वर्षासाठीच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी : बेवारस प्रेताचे अंत्यसंस्कार करण्यासाठी एकूण खर्च 3000 दाखविला आहे. यात फोन बिल 500/- रू. दिले. एका बॉडीसाठी 500/- रू. फोन बिल कसे येवू शकते खूलासा करावा.

मा. आयुक्त : यात प्रत्येक वेळी गाडी भाडेने मागविण्याची गरज पडणार नाही. एक महिण्यात एक ते पाच बेवारस प्रेताचे अंत्यसंस्कार करण्यासाठी 15 हजार खर्च होणार आहे जर पाच पेक्षा जास्त होत असेल तर प्रती बेवारस खर्च 3000 देण्यात येणार आहे. 24 तासासाठी ते 500 रू. असावे असे ते आहे. ते कसे दिले याची तपासणी करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.अ.रशिद खान : मुस्लीम समाजाचे प्रेत असेल तर त्यांना दफन केले जाते त्याप्रमाणे अंत्यसंस्कार करावे. मुस्लीम समाजाची कमेटी आहे ते मुस्लीम समाजाचा व्यक्ती असेल तर दफनच करावे लागते नसता ते विरोध करतात.

अग्निशमन अधिकारी : बेवारस प्रेताची माहिती पोलीस खात्याकडून महापालिकेला मिळते. त्यावेळी इतर सर्वीसेस जसे डिझेल वगैरे खर्च असे मिळून टेलीफोन बील 500/- हे 24 तासासाठी दिलेले आहे.

मा.आयुक्त : जर ॲथोरॉईज कमेटी असेल व पोलीस विभागाच्या मदतीने तसे अत्यंसंस्कार केले जाईल.

श्री.मधुकर सावंत : बेवारस प्रेत हे कोणत्याही समाजाच्या व्यक्तीचे असू शकते.

श्री.संजय जोशी : मेडीकल कॉलेज तसेच पोलीस विभागाचा रिपोर्ट घेवून त्यानुसार अंत्यसंस्कार करावे.

मा. सभापती : मंजूरी देण्यात येते. स.सदस्यांच्या सुचनाची प्रशासनाने दखल घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेवारस प्रेताच्या अंत्यसंस्कारासाठी, पंचशील महिला बचत गट, जयभीमनगर, घाटी, औरंगाबाद या बचत गटास औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आढळणाऱ्या बेवारस प्रेतांच्या अंत्यसंस्काराचे काम पाच वर्षासाठी देण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच प्रत्येक कॅलेंडर महिन्यात एक ते पाच पर्यंत बेवारस प्रेतांचे अंत्यसंस्कार करण्यासाठी रू.15,000/-(रूपये पंधरा हजार फक्त) आणि एका कॅलेंडर महिन्यात पाच पेक्षा जास्त बेवारस प्रेतांचे कॉल प्राप्त झाल्यास अंत्यसंस्कार करण्यासाठी प्रती बेवारस प्रेत रू.3000/- खर्च देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 167 :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/1107/प्र.क्र.92/सेवा-9 मंत्रालय, मुंबई दि. 24 सप्टेंबर 2007 नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दि.1 जुलै 2007 पासून 6% वाढ मंजुर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.1.7.2007 पासून महागाई भत्ता 35% ऐवजी 41% दराने अदा करण्यासाठी मासिक रू.14.59 लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सन 2007-08 च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीतून सदरील खर्च भागविण्यात येईल. महागाई भत्ता 35% ऐवजी 41% या दराने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना माहे जुलै 2007 पासून लागू करण्यास व सप्टेंबर 2007 पर्यंतची थकबाकी अदा करण्यास तसेच माहे ऑक्टोबर 2007 च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात महागाई भत्ता समाविष्ट करण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेऔरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना महागाई भत्ता 35% ऐवजी 41% या दराने माहे जुलै 2007 पासून लागू करण्यास व सप्टेंबर 2007 पर्यंतची थकबाकी अदा करण्यास तसेच माहे ऑक्टोबर 2007 च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 168 :**

1. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मनपा आस्थापनेवरील कार्यरत स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय देयक परतावा नियमानुसार शा.नि.क्र.एमएजी/2005/9/प्र.क्र.1/आरोग्य, मंत्रालय, मुंबई दि.19.3.2005 नुसार वैद्यकीय देयक परतावा शासनाचे सुधारीत वैद्यकीय परिपुर्तीचे नियम अन्वये मनपा वैद्यकीय देयक परतावा नियमात दुरूस्ती करून शासन निर्णय दि.10.10.2006 प्रमाणे अग्रीम मर्यादा रू.1.50 लक्ष तसेच रक्ताचा कर्करोग ऐवजी सर्व कर्करोगाचा समावेश करून 90% वैद्यकीय देयक परतावासह प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत ठराव क्र.835/2 दि.20.6.2007 नुसार पारीत झाला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **मनपा वैद्यकीय देयक परतावा विनियमात असलेले जुन्या शासन निर्णयाप्रमाणे विद्यमान आजार** | 1. तीव्र हृदय रोग<br>2. मेदुचे विकार<br>3. फुफ्फुसाचे विकार<br>4. बेशुध्द अवस्था<br>5. रक्तदाब<br>6. धनुर्वात<br>7. घटसर्प<br>8. अपघात<br>9. पोटाचे तीव्र विकार | 10.विषमज्वर<br>11.डोळ्यातील रेटीनाचा त्रास<br>12.प्रसुती व स्त्री रोगाच्या अवघड अवस्था<br>13.आकस्मीक गर्भपात<br>14. मुत्रपिंड व मुत्राशयाचे विकार<br>15. गॅंगरीन | 16. कान, नाक व घसा फॉरेन बॉडीमुळे होणारे त्रास<br>17. जन्मत: व्यंग ज्यामध्ये शस्त्रक्रिया आवश्यक आहे<br>18. आगीमुळे भाजणे<br>19. एड्स<br>20. मनोविकृती |

| | | |
|---|---|---|
| **मनपा विनियमात समाविष्ट करावयाचे सुधारीत शासन निर्णयाप्रमाणे प्रस्तावित नवीन आजार** | 1. जोरदार रक्तस्त्राव<br>2. गॅस्ट्रो एन्ट्रायटीस<br>3. निशातेनावस्था (**Coma**)<br>4. इपीलेप्सी<br>5. ॲक्युट लेकोमा | 6. स्पायपनस स्कॉड (मज्जातंतू) संबंधीत कामस्मीक आजार<br>7. उष्माघात.<br>8. रक्त संबंधातील आजार.<br>9. प्राणाी चावल्यामुळे होणारी विषबाधा<br>10. रसायनामुळे होणारी विषबाधा. |
| **जुन्या शासन निर्णयाप्रमाणे 80% वैद्यकीय परतावा देण्यात येतो.** | सुधारीत नियमाप्रमाणे शासनाने 90% वैद्यकीय परतावा देण्याचा निर्णय आहे. | |
| **एकूण 3 आजारांसाठी वैद्यकीय अग्रीम मर्यादा रू.45,000/- मंजूर होती. ह्दयाची शस्त्रक्रिया, मुत्रपिंड रोपण व कर्करोग रक्ताचा.** | सुधारीत निर्णयानुसार 3 आजारांसाठी अग्रीम देण्याचा निर्णय आहे. मर्यादा रू.1,50,000/- पर्यंत.<br>1. ह्दय शस्त्रक्रियांची प्रकरणे.<br>2. ॲन्जीओप्लॅस्टी शस्त्रक्रिया.<br>3. सर्व कर्करोग. | |

2. तसेच महापालिकेचा कोणताही कर्मचारी कामावर असतांना अपघात झाला तर वैद्यकीय परतावा 100% देणेस मंजुरी प्राप्त होणे.

3. यापुढे कोणत्याही विषया अंतर्गत प्राप्त होणाऱ्या सर्व शासन निर्णयाची महापालिकेतर्फे अनुपालन करण्यास्तव मान्यता प्रदान करण्यात यावी.

वरील प्रमाणे अ.क्र. 1 ते 3 नुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा आस्थापनेवरील कार्यरत स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय देयक परतावा नियमानुसार शासनाचे सुधारीत वैद्यकीय परिपुर्तीचे नियम अन्वये मनपा वैद्यकीय देयक परतावा नियमात दुरूस्ती करून शासन निर्णय दि.10.10.2006 प्रमाणे अग्रीम मर्यादा रू.1.50 लक्ष तसेच रक्ताचा कर्करोग ऐवजी सर्व कर्करोगाचा समावेश करून 90% वैद्यकीय देयक परतावा देण्यास तसेच खालील दर्शविल्यानुसार मनपा विनियमात नवीन आजारांचा समावेश करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| **मनपा विनियमात समाविष्ट करावयाचे प्रस्तावित नवीन आजारांचा समावेश करण्यास मंजुरी देण्यात येते.** | 1. जोरदार रक्तस्त्राव<br>2. गॅस्ट्रो एन्ट्रायटीस<br>3. निशातेनावस्था (**Coma**)<br>4. इपीलेप्सी<br>5. ॲक्युट लेकोमा | 6. स्पायपनस स्कॉड (मज्जातंतू) संबंधीत कामस्मीक आजार<br>7. उष्माघात.<br>8. रक्त संबंधातील आजार.<br>9. प्राणाी चावल्यामुळे होणारी विषबाधा<br>10. रसायनामुळे होणारी विषबाधा. |
| सुधारीत नियमाप्रमाणे 90% वैद्यकीय परतावा देण्यास मंजुरी देण्यात येते. | | |
| सुधारीत निर्णयानुसार 3 आजारांसाठी अग्रीम मर्यादा रू.1,50,000/- पर्यंत वाढविण्यास मंजुरी देण्यात येते.<br>1. ह्दय शस्त्रक्रियांची प्रकरणे.<br>2. ॲन्जीओप्लॅस्टी शस्त्रक्रिया.<br>3. सर्व कर्करोग. | | |

तसेच महापालिकेचा कोणताही कर्मचारी कामावर असतांना अपघात झाला तर वैद्यकीय परतावा 100% देणेस मान्यता देण्यात येते. तसेच यापुढे कोणत्याही विषया अंतर्गत प्राप्त होणाऱ्या सर्व शासन निर्णयाची महापालिकेतर्फे अनुपालन करण्यास देखील मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 169 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, बाबा पेट्रोल पंप चौक येथे लेफ्ट टर्नसाठी स्वतंत्र मार्ग तयार करणे व डांबरीकरण करणे या कामाचे र.रू.12,88,473/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून सदर कामाची दुसऱ्या वेळेस निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर कामातरस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे, तसेच रस्त्याच्या बाजूस साईड गटार बांधून पादचारी मार्ग तयार करणे या बाबींचा समावेश आहे. प्रस्तुत रस्त्याची एकूण लांबी 500 मी. व रूंदी साधारणपणे 4 मी. आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | ए.एस. कन्स्ट्रक्शन | 9.90% कमी दराने |
| 2. | चंद्रम्मा आशन्ना | 8.13% कमी दराने |
| 3. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 6.00% कमी दराने |
| 4. | राजेंद्रसिंग अजितसिंग | 5.50% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 9.90% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 9.90% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बाबा पेट्रोल पंप चौक येथे लेफ्ट टर्नसाठी स्वतंत्र मार्ग तयार करणे व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 9.90% कमी दराची ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 170 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पैठणगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी तिसऱ्या वेळेस बोलाविण्यात आलेल्या निविदांपैकी, श्री.शेख मसूद यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराच्या 20% जास्त दराने करून घेण्यात येत असून सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.8,42,940/- एवढी होती. परंतु प्रत्यक्ष काम करतांना इन्टॅक या ऐतिहासिक वास्तुच्या वास्तुतज्ञांनी प्रत्यक्ष स्थळावर सुचविलेल्या कामात काही अतिरिक्त बाबी होत असून यामुळे कामात रक्कम रू.4,29,570/- ची वाढ होत असून, त्यामुळे सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.12,46,460/- एवढी होत असून त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेस्तव आदेशीत केलेले आहे. मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त वाढीव काम हे अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येईल.

तरी सदरील कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.12,46,460/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामामध्ये काही अतिरिक्त बाबींमुळे रक्कम रू.4,29,570/- वाढ होत असल्याने या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.12,46,460/- तसेच वाढीव काम अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ गुत्तेदार श्री. शेख मसूद यांचेमार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 171 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रियेसाठी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रिया संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) हे या मध्ये तज्ञ असल्याने तांत्रिक सल्ला घेणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) चे सदस्य सचिव श्री.डी.बी.बोरालकर यांचे सोबत बैठक घेऊन मा.स्थायी समितीच्या दिनांक 16.8.2006 रोजीच्या बैठकीत विषय क्रमांक 82 नुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांची प्रकल्प सल्लागार(PMC) म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी प्राप्त आहे व त्यांना प्रक्रियेच्या अंदाजित रक्कमेचा 1% रक्कम किंवा जास्तीत जास्त रूपये 20.00 लक्ष देणेसाठी मंजुरी प्राप्त आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) ने घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रियेसाठी निविदा राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिल्या. निविदा तीन लिफाफा पध्दतीने मागविण्यात आल्या असुन अंतिम तारखेपर्यंत एकूण 7 निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

1. Hydroair Tectonics(PCD) Ltd.
2. SELCO International Ltd.
3. TELPRO Systems Ltd.
4. M/s. Ramky Enviro Engineers Ltd.
5. SPID Combines Pvt. Ltd.
6. Hanjer Biotech Energies Ltd.
7. Bharuch enviro Infrastructure Ltd.

निविदा छाननी अंती खालील निविदा नमुद कारणांमुळे रद्द करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारक | कारण |
|---|---|---|
| 1. | Hydroair Tectonics(PCD) Ltd. | No experience in operation & maintenance. |
| 2. | TELPRO Systems Ltd. | No experience in operation & maintenance. |
| 3. | SPID Combines Pvt. Ltd. | No experience & not full filled conditions of tender. |
| 4. | Hanjer Biotech Energies Ltd. | Bid security not submitted. |
| 5. | Bharuch enviro Infrastructure Ltd. | Bid security not submitted. |

खालील दोन निविदा धारक यांनी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे पुर्तता केली असल्याने त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आल्या.

1) SELCO International Ltd.
2) M/s. Ramky Enviro Engineers Ltd.

सदर दोन्ही निविदांचे लिफाफा उघडण्यापुर्वी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी वरील दोन्ही पात्र निविदा धारकांच्या सुरू असलेल्या प्रकल्पांची पाहणी करून अहवाल देणे बाबत सुचविले असून हैद्राबाद व बेंगलोर येथील दोन्ही निविदा धारक यांचे प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. हैद्राबाद येथील SELCO International Ltd. यांच्या प्रकल्पाची पाहणी केली असता, त्यांचा प्रकल्प समाधानकारकरित्या चालू असून Professionally organized असून सदर प्रक्रियेसाठी भारताचे राष्ट्रपती यांचेकडून सन 2004 मध्ये All India aweard मिळालेला आहे.

प्राप्त दोन्ही पात्र निविदाधारकां पैकी SELCO International Ltd. यांचा दर सर्वात कमी असल्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) म्हणजेच मनपाचे प्रकल्प सल्लागार (PMC) च्या

Expert Committee ने SELCO International Ltd. यांची निविदा स्विकारणे करीता शिफारस केली आहे. निविदा धारक यांना Tipping Fee पहिले तीन वर्षासाठी सम प्रमाणात राहणार असून प्रत्येक तीन वर्षानंतर 10% वाढ करण्यात येईल असा उल्लेख आहे.

SELCO International Ltd. यांचे Tipping Fee दर रूपये 100/- Per M.T. असून Ramky यांचे दर रूपये 225/- Per M.T. आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी निविदाची छाननी करून मनपाकडे अहवाल सादर केला आहे.

जमीन खरेदीसाठी महानगरपालिका प्रशासनाची प्रक्रिया सुरू असून सहा ते सात ठिकाणची जागा पाहण्यात आली असुन, मौ. जोगवाडा येथील जागा यासाठी योग्य असल्याबाबतचा घनकचरा व्यवस्थापन समितीचा अहवाल प्राप्त झाल्याने इतर खात्याकडून ना हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करणेसाठी कळविले असता, स्थानिक ग्राम पंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने व तेथील नागरिकांचा विरोध असल्याने इतर ठिकाणची जागा पाहणी करून निर्णय घेण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सदर प्रकल्पासाठी जमीन खरेदीची प्रक्रिया येत्या एक महिन्यात पुर्ण होण्याची शक्यता असल्याने घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेची निविदा माहितीस्तव तथा मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेसमोर पाठविण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी SELCO International Ltd. यांची निविदा खालील अटी व शर्तीसह मंजुरीसाठी शिफारस केली आहे.

1. निविदा धारक यांनी स्वतःच्या खर्चाने पॉवर प्लँट आणि Auxiliary fuel व inerts/rejects मटेरीयलची विल्हेवाट (Disposal) लावण्यासाठी स्वतंत्र जमीन खरेदी करावी.
2. जमीन खरेदी, Use of Auxiliary fuel व disposal of inerts/rejects साठी महानगरपालिका कुठलाही खर्च देणार नाही.
3. मनपाची जागा Disposal of inerts/rejects साठी वापरता येणार नाही.(M.S.W. च्या व्यतिरिक्त).
4. प्रकल्प स्थळावर टाकण्यात आलेला घनकचरा वरच मनपातर्फे Tipping Fee रूपये 100/- प्रति M.T. प्रमाणे देण्यात येईल. घनकचरा प्रक्रियेचे पुर्णपणे समाधान झाल्यानंतर रक्कमेची अदायगी करण्यात येईल.
5. प्रकल्पाद्वारे निघणारे Fly ash व इतर Solid waste हे विटा बनविणेसाठी वापरण्यात यावेत.
6. प्रक्रियेतील परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा व प्रदुषण Foul oder व जन्तू होणार नाही याची दक्षता घ्यावी.
7. भूखंडाचा परिसर व भोवतालच्या जागेमध्ये झाडे लावुन Green zone व Buffer zone तयार करून त्यांचे संगोपन करावे.
8. Carbon credit point व income सर्व महानगरपालिकेसाठी राहील.
9. निविदा धारक यांना मनपातर्फे Letter of award प्राप्त झाल्यानंतर 12 आठवड्यांच्या आत पॉवर पर्चेस करारनामा करावा लागेल.
10. RFP प्रमाणे काटेकारपणे अंमलबजावणी करून प्रक्रिया मुदतीत पुर्ण करावी.
11. M.S.W. rule 2000 च्या अटी व शर्ती पुर्ण करणे निविदा धारक यांचेवर बंधनकारक राहील.
12. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांचेकडून MSW Rule 2000 प्रमाणे रितसर परवानगी Operation & maintenance of facility साठी घेणे बंधनकारक आहे.
13. महानगरपालिकेस लागु असलेले सर्व कायदे, अटी व शर्ती लागू राहतील.
14. वरील सर्व किंवा एकही अटीची पुर्तता न केल्यास निविदा रद्द करण्यात येईल व याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

वरील प्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी SELCO International Ltd. Hydrabad यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या मुल्यमापन करून मंजुरीसाठी शिफारस केलेली आहे.

करीता सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

मा. आयुक्त : नारेगांव येथील कचरा डेपो शिफ्ट करून कचऱ्याची प्रोसेसींग करणे बंधनकारक आहे. पीएमसी नेमणे, ठरवून द्यावे. निविदा कार्यवाही पूर्ण करून जागा महापालिका उपलब्ध करून देते. 30 एकर जागा उपलब्ध करून देत आहोत. 60 ते 70 टक्के प्रोसेस होत आहे. नारेगांव येथील कचरा डेपो स्थलांतरीत करण्याचे मा.न्यायालयाचे आदेश आहेत. 12 व्या वित्त आयोगाचा निधी आहे. जागेबाबत कार्यवाही होत आहे. 10-15 दिवसांत स्थायी समितीच्या मान्यतेने सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मान्यतेसाठी जाईल. अटी व शर्ती बघून किती वेस्ट टू एनर्जी होईल हे बघून महापालिकेला जागा उपलब्ध करून द्यायची आहे.

श्री.अ.रशिद खॉन : पॉलीसी सर्वसाधारण सभेने ठरविली आता स्थायी समिती कडे येण्याचे कारण काय?

श्री.संजय शिरसाट : या प्रकल्पाला सर्वसाधारण सभेने मान्यता दिली, एक पॉलीसी डिसीजन झाल्यानंतर जागा डिसाईड केल्यानंतर यात असे म्हटले की एका ठिकाणी जागा पाहणी केली परंतू तेथे त्या नागरीकांचा विरोध असल्यामुळे नाहरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे इतरत्र जागेचा शोध सुरू आहे. जी स्टेज आहे ती सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतरच जागा पाहण्याचा आहे. सर्वसाधारण सभेने मान्यता दिली म्हणून हा प्रोजेक्ट उभारला जात आहे. बीओटीवर कामे करतांना सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली, जागा स्थायी समितीच्या मान्यतेने घेतली.

मा.आयुक्त : सर्व बीओटी प्रस्ताव दोन वेळेस सर्वसाधारण सभेकडे सादर केलेले होते. मान्यता मिळाल्यानंतर कार्यवाही केलेली आहे. सर्वसाधारण सभेला सुध्दा माहिती पाहिजे की प्रोसेस कशा पध्दतीने होत आहे. त्यासाठी दोन वेळेस सर्वसाधारण सभेकडे ठेवावेच लागते.

श्री.संजय शिरसाट : सर्वसाधारण सभेने ही पॉलीसी डिसाईड केली असेल काम स्पीडने करायचे असेल तर आज एजन्सीला मान्यता देणार, नंतर जागा शोधणार त्यानंतर खरेदी करण्यासाठी पुन्हा सर्वसाधारण सभेकडे सादर करणार.

मा. आयुक्त : ही एजन्सी जागेसाठी नाही.

श्री. संजय शिरसाट : सर्वसाधारण सभेने एजन्सीला प्रोसेस करण्यासाठी मान्यता दिली याचा अर्थ जागा पाहणार ती जागा खरेदी करणार.

मा. आयुक्त : वेस्ट टू एनर्जी करायचे की नाही हे धोरण ठरविण्यासाठी सर्वसाधारण सभेपूढे जावेच लागणार आहे.

श्री.अ.रशिद खान : जोपर्यत सर्वसाधारण सभेची मान्यता घेत नाही तोपर्यत टेंडर कसे काढले.

मा. आयुक्त : या सभागृहाने मान्य करावे सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याची गरज असेल तर तसे विधी सल्लागार यांचे मत घेवून कार्यवाही केली जाईल.

श्री.संजय शिरसाट : टेंडर कशाच्या अधारे काढले याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : प्रोसेसिंगसाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली होती.

श्री.संजय शिरसाट : प्रोसेसींग करायची म्हटले तर एक जागा निश्चित करावी लागणार होती. परंतू आजही जागा शोधण्याचे काम चालू आहे. जागेला सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली आहे का?

मा. आयुक्त : मान्यता घेणार आहोत. खाजगी जागा घेतल्याच्या नंतर स्थायी समितीच्या मान्यतेनंतर सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली जाईल.

श्री.संजय शिरसाट : या ठरावास मान्यता दिल्यानंतर सहा महिने जागाच मिळाली नाही तर पूढील कार्यवाही काय करणार आहोत.

मा. आयुक्त : जोपर्यत जागा मिळणार नाही तोपर्यत वर्क ऑर्डर देता येणार नाही. एक वर्षापासून कार्यवाही चालू आहे आणखी एक महिना लागण्याची शक्यता आहे. हा प्रस्ताव या सभागृहाच्या मान्यतेनंतर सर्वसाधारण सभेकडे जाायला पाहिजे. असे प्रशासनाचे मत आहे. या बाबत लिगल पोजीशन तपासून घेवून पाठविला जाईल परंतु पुन्हा 15 ते 20 दिवसानंतर कोणती जागा विकत घेत आहेत तसा ठराव या सभागृहासमोर येईल. तो सुध्दा ठराव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी देण्यात येईल. ही सर्व रक्कम 12 व्या वित्त आयोगाची आहे.

श्री.अ.रशिद खान : सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता टेंडर काढले काय?

मा.आयुक्त : टेंडर काढले परंतू कुणालाही माहिती नव्हते की प्रोसेसिंग काय करणार आहेत.

श्री.संजय शिरसाट : ज्या ठिकाणी जागा बघीतली आहे जर करमाडच्या पूढे जागा मिळाली तर जी प्रोसेस करीत आहोत त्यात गाडयावर कि.मी. वर फरक जाणवणार नाही का?

मा.आयुक्त : जागा देणार आहोत कचरा तिथपर्यत आणून देण्याची अट असणार आहे. जागा कुठे व किती अंतरावर देतो याचा प्रश्न येत नाही. वाहतुकीचा खर्च हा प्रति कि. मी. वर आहे. जागा जवळ मिळाली तर वाहतुकीचा खर्च कमी पडेल. परंतु प्रोसीसींगच्या खर्चास फरक पडत नाही.

श्री.संजय शिरसाट : प्रोसेसिंग करण्याला फरक पडणार नाही परंतू प्रस्ताव येण्यापूर्वी अगोदर जागा डिसाईड करायला पाहिजे होती.

मा.आयुक्त : कच-यांच्या संदर्भात तिन प्रोजेक्ट आहे. जागा स्थंलांतर करणे नारेगाव येथील कचरा डेपो स्थंलातरीत करणे. ते करण्यासाठी नारेगाव येथील कचरा डेपो बंद करणे व नवीन जागा घेणे. नवीन जागा घेण्याचा प्रस्ताव एकदम शेवटच्या स्टेपला आहे. त्या संदर्भात प्रस्ताव या सभागृहाकडून सर्वसाधारण सभेकडे जाणार. त्यानंतर जागा विकत घेतली जाईल. त्यास एक दोन महिण्याचा कालावधी अपेक्षीत आहे. दुसरा ट्रान्सपोर्ट करण्याचा आहे. तसेच डोअर टू डोअर कचरा जमा करण्याचा. डोअर टू डोअर कलेक्शन व ट्रान्सपोर्ट करण्यासाठी टेंडरमध्ये स्पष्ट दिलेले आहे की ही जागा 20 ते 25 कि. मीटरच्या दरम्यान असेल. स्थलांतर करण्यासाठी पूर्ण पैसे केंद्र शासनाकडून 12 वा वित्त आयोगाचे आहेत. यात एक ट्रान्सपोर्टचा प्रस्ताव आहे तिसरा प्रस्ताव तेथे कचरा पोहचल्यानंतर त्यावर प्रोसेसींग करणे, महापालिकेने कचरा डिस्पोजल केला तर 100 रू.पेक्षा जास्त खर्च लागेल. जो प्रोसीसींगचा 300 ते 400 रू. खर्च लागला असता तो 100 रू.मेट्रीक टन लागेल. महापालिकेला लॅण्डफिल करण्यासाठी 100 रू. पेक्षा जास्त खर्च येतो म्हणून यास मान्य करीत आहोत. कार्बन क्रेडिट चांगले मिळेल जे काही मिळेल ते महापालिकेला मिळेल. जे 100 रू.देत आहोत त्यापेक्षा जास्त पैसे कार्बन क्रेडीटने परत मिळणार. जे की बोनस मिळणार आज महापालिकेला डिस्पोजल साठी 100 रू. पेक्षा जास्त लागतात.

श्री.संजय शिरसाट : महापालिकेला बेनीफिट मिळणे शक्यच नाही उलट महापालिकेला काही लोकांनी फसवणूक केली. नारेगाव कचरा डेपोची 16 एकर जागा संबधीत ठेकेदाराने बॅकेकडे खोटे कागदपत्र तयार करून तारण ठेवलेली आहे. त्यानंतर महापालिकेने

त्या व्यक्तीवर पोलीसात गुन्हा दाखल केला तो भाग वेगळा. यावर महापालिकेचा किती खर्च होणार आहे यावर चर्चा करावी.

मा. आयुक्त : प्रत्येक मेट्रीक टनच्या मागे 100 रू. लागणार आहे स्वत:हून डिस्पोज केले तर 100 रू. पेक्षा जास्त लागतात. म्हणून टेंडर असेच काढले होते की जे दुस-या क्रमांकावर होते त्यांनी 225 रू.ची मागणी केलेली होती. कचरा डिस्पोजल करतांना खुपच खर्च लागतो. नुसता कचरा टाकून उपयोग नाही प्रोसेस करावी लागते. 100 रू. प्रमाणे डिस्पोजल होवून जाते.

डॉ.आशा बिनवडे : यापेक्षा आणखी जास्त खर्चाचे होणार. आरोग्य विभागाने माहिती द्यावी. महापालिकेला ही डोकेदुखी नको म्हणून कार्यवाही होत आहे असे वाटते परंतू पाणी पंपीगसाठी मोठया प्रमाणात विजेचा वापर होतो ती यातून वापरता येणार नाही याचा विचार प्रशासन का करीत नाही. काही प्रमाणात विज घेण्याचे ठरवले पाहिजे.

मा. आयुक्त : यातून विज घेतल्यास महापालिकेला महाग पडेल.100 रू. ऐवजी 200 रू. करतील. सर्वसाधारण सभेकडून प्रोसेसिंगसाठी मान्यता घेतली होती.

श्री.संजय शिरसाट : प्रोसेसिंग मध्ये काय काय येते, जागा लागेल हे गृहीत धरून मान्यता घेतलेली होती. पुन्हा कशासाठी आलेले आहे.

मा.आयुक्त : जागे संदर्भात हा प्रस्ताव नाही. प्रोसेसींग साठी आहे.आपल्याला वेगळे काही वाटत असेल तर असा निर्णय घ्यावा की लिगल तपासणी करून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याची गरज असेल तर पाठवावे नसता नाही.

श्री.अ.रशिद खान : सर्वसाधारण सभेने मान्यता दिली पॉलीसी निश्चित केली पुन्हा पाठविणे योग्य की अयोग्य.

मा. आयुक्त : सर्वसाधारण सभेकडे पाठवायचे की नाही विधी सल्लागार यांचा सल्ला घेवून प्रशासन कार्यवाही करेल. प्रोसेसींगसाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली होती. पुन्हा जागेची मान्यतेसाठी ठेवावे लागणार आहे.

मा.सभापती : प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रियेसाठी प्राप्त दोन्ही पात्र निविदाधारकां पैकी SELCO International Ltd. यांचा दर सर्वात कमी असल्याने व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने तांत्रिकदृष्ट्या मुल्यमापन करून शिफारस केली असल्याने, प्रस्तावात नमुद 1 ते 14 च्या अटी शर्तीच्या अधीन राहून SELCO International Ltd. Hydrabad यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 172 :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड -ड प्रभागाचे घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम 2000 अंतर्गत साफसफाई व डोअर टू डोअर कलेक्शनसाठी 3 विभागात (अे/बी/सी) विभाजन करून दिनांक 01 सप्टेंर 2006 पासून खाजगीकरणाच्या माध्यमातून खालील कंत्राटदारांना 1 वर्षासाठी कंत्राट देण्यात आले होते.

| विभाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नाव | डोअर टू डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|
| **अे** | ईश्वरलाल खरे | जागृती एंटरप्रायजेस |
| **बी** | मोना लेबर सप्लायर्स | मोना लेबर सप्लायर्स |
| **सी** | सेंटर फॉर डेव्हलपमेंट | सेंटर फॉर डेव्हलपमेंट |

वरील कंत्राटदाराचे कंत्राट दिनांक 30 ऑगस्ट 2007 रोजी संपलेले असून निविदेबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी कमीत कमी 2 महिन्यांचा कालावधी लागणार असल्यामुळे त्या कालावधीत नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता व वॉर्ड-ड प्रभागातील स्वच्छतेचा विचार करता वरील कंत्राटदारांना पुर्वीच्या दराप्रमाणेच माहे सप्टेंबर व ऑक्टोबर 2007 या दोन महिन्याच्या कलावधीसाठी मुदतवाढ देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ.आशा बिनवडे : आतापर्यंतसंबंधीत एजन्सीचे काम समाधानकारक आहे का? तरच मुदतवाढ देणे योग्य होईल.

मा. आयुक्त : दोन भागाचे खाजगीकरण आहे. ट्रान्सपोर्ट करण्याचे टेंडर काढले. त्यातील 15-20 मजूर निघतील ते इतर कामासाठी घेता येतील. निविदा प्रक्रिया करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागेल. दोन महिने झालेले आहेत, फेब्रुवारी मध्ये टेंडर काढता येईल.

मा. सभापती : निविदा प्रक्रियेसाठी लागणारा वेळ विचारात घेता सहा महिने (फेब्रुवारी अखेर पर्यंत) कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वॉर्ड-ड प्रभागाचे घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम 2000 अंतर्गत साफसफाई व डोअर टू डोअर कलेक्शनसाठी खाजगीकरणाच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या साफसफाईचे कामासाठी निविदा प्रक्रियेसाठी लागणारा वेळ विचारात घेता, खालील दर्शविलेल्या कंत्राटदारांना पुर्वीच्या दराप्रमाणेच माहे सप्टेंबर 2007 ते फेब्रुवारी 2008 या सहा महिन्याच्या कलावधीसाठी मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| विभाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नाव | डोअर टू डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|
| **अे** | ईश्वरलाल खरे | जागृती एंटरप्रायजेस |
| **बी** | मोना लेबर सप्लायर्स | मोना लेबर सप्लायर्स |
| **सी** | सेंटर फॉर डेव्हलपमेंट | सेंटर फॉर डेव्हलपमेंट |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 173 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.85 काबरानगर गारखेडा अंतर्गत लक्ष्मीनगर पुर्व येथे खुल्या जागेत सांस्कृतिक हॉल बांधणे करीता सा.बां. विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.19,97,660/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत "व्यापारी संकुले व इतर इमारती" पान क्र.W-229 अ.क्र.15 च्या तरतुदी अन्वये करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,97,660/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.85 काबरानगर गारखेडा अंतर्गत लक्ष्मीनगर पुर्व येथे खुल्या जागेत सांस्कृतिक हॉल बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या र.रू.19,97,660/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 174 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.64 क्रांती चौक भागातील विविध ठिकाणच्या खुल्या जागा विकसीत करणे करीता सा.बां. विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,99,800/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत "विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण" पान क्र.W-201 अ.क्र.26 च्या तरतुदी अन्वये करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू. 14,99,800/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.64 क्रांती चौक भागातील विविध ठिकाणच्या खुल्या जागा विकसीत करणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,99,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 175 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.10 जयसिंगपुरा प्रभागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज शेजारील कब्रस्तानास संरक्षित भिंत बांधणे करीता सा.बां.विभागाचे सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,99,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत "स्मशान भूमी विकास" या लेखा शिर्ष अंतर्गत पान क्र.W-229 अ.क्र. 3 च्या तरतुदी अन्वये करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू. 14,99,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.10 जयसिंगपुरा प्रभागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज शेजारील कब्रस्तानास संरक्षित भिंत बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,99,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 176 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.15,92,131/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे फेरनिविदा मागविण्यात आल्या असता

एकूण 1 निविदा पत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 1 निविदापत्रक प्राप्त झाले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1) आर. के. कन्स्ट्रक्शन 19.86% कमी दराने

प्राप्त झालेली श्री.आर.के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.86% कमी दराची निविदा असून त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.आर. के. कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 19.86% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेली श्री. आर. के. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.86% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 177 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी) परिसरातील रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे बाबत दि.6.12.2006 रोजी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या दालनात संबंधीत विभागाचे अधिकारी व मनपा पदाधिकारी व अधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत अधिष्ठाता यांनी सदर परिसरातील रस्त्यांची स्थिती खुपच खराब झालेली असल्यामुळे रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांची गैरसोय टाळण्यासाठी सदर भागातील डांबरीकरण महानगरपालिकेतर्फे करणे बाबत विनंती केली होती. सदर काम हे महानगरपालिका कार्यक्षेत्राच्या बाहेर असल्या कारणाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर केला असता त्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.818/08 दि.18.5.2007 च्या सभेत मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रू.19,63,300/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी 1235 मी. अराणि रूंदी साधारणपणे 3 मी. आहे. यासाठी ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविल्या असता सदर कामासाठी एकूण 7 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 7 निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | चंद्रम्मा एन. आशन्ना | 15.00% कमी दराने |
| 2. | राजेंद्रसिंग अजितसिंग | 14.40% कमी दराने |
| 3. | के. बी. पाथ्रीकर | 13.21% कमी दराने |
| 4. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 11.83% कमी दराने |
| 5. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 10.10% कमी दराने |
| 6. | विजय बिशनदास अरोरा | 7.86% कमी दराने |
| 7. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 7.89% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी चंद्रम्मा आशन्ना यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 15.00% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी चंद्रम्मा आशन्ना यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 15.00% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी) परिसरातील रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा 15% कमी दराची चंद्रम्मा आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 178 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.9 येथील नंदनवन कॉलनी समोरील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.14,98,700/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षका मधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 726 मी. व रूंदी सरासरी 4 मी. आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.14,98,700/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.9 येथील नंदनवन कॉलनी समोरील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,98,700/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 179 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.18 पवननगर येथे विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.16,31,600/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते(शहर) या लेखाशिर्षका मधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 1135 मी. व रूंदी सरासरी 4 मी. आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.16,31,600/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.18 पवननगर येथे विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,31,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 180 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.26 अंतर्गत गणेश, नुतन यशवंत, नवभारत व इतर विविध स्वयं विकसीत गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.12,93,400/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 1260 मी. व रूंदी सरासरी 4 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.12,93,400/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 अंतर्गत गणेश, नुतन यशवंत, नवभारत व इतर विविध स्वयं विकसीत गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,93,400/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 181 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत शिवदत्त हौ. सोसायटी येथील रस्त्यासाठी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.11,94,421/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकूण 4 निविदा पत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दरपत्रक प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | टेंभुर्णीकरण प्रल्हाद सुरेश | 22.40 % कमी दराने |
| 2. | राणा कन्स्ट्रक्शन | 21.79% कमी दराने |
| 3. | रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | 21.35% कमी दराने |
| 4. | मुबारक मेहबुब पठाण | 18.25% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची असून ती अं.प.दरापेक्षा 22.40% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची अं.प.दरापेक्षा 22.40% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत शिवदत्त हौ. सोसायटी येथील रस्त्यासाठी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 22.40% कमी दराची श्री.टेंभुर्णीकरण प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 182 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन 2007-08 या शैक्षणिक वर्षाकरीता महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना गणवेश साहित्य (आयएसओ 9001 मानांकन प्राप्त कंपनीचे रेक्झीन व कॅनव्हॉस शुज प्रत्येकी एक जोड, पायमोजे रंगीत व पांढरे प्रत्येकी एक जोड व नेक टाय प्रत्येकी एक) द्यावयाचे आहे. याकरीता राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.22.6.2007 ते 29.6.2007 पर्यंत एकूण 7 निविदा विक्री झाल्या. दि.2.7.2007 रोजी निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकास 7 निविदा प्राप्त झाल्या. निविदेतील अटींची पुर्तता करणाऱ्या निविदा धारकांचे नमुने शासनमान्य प्रयोगशाळेत तपासणी करीता पाठविण्यात आले. सदरील निविदा धारकांचे नमुने आवश्यक निकष पुर्ण करीत असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिला आहे. त्यानुसार निविदा दरपत्रकांचे दुसरे पाकीट उघडण्यात आले. मे. अभय ट्रेडर्स, मे.एमआरव्ही इन्टरप्रायजेस, ओ.के.ट्रेडर्स, ओरंगाबाद, मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादीत, लिबर्टी शुज लि. यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या उत्पादनाकरीता कमी प्राप्त आहेत. शिक्षण विभागाने दिलेल्या विद्यार्थी संख्येकरीता प्राप्त कमी दरानुसार साहित्य खरेदी करीता रू.46,53,815/- एवढा खर्च येईल. सदरील खर्च विद्यार्थी विशेष कल्याण योजना या लेखाशिर्षात ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल. या शिर्षाअंतर्गत रू.40.00 लक्ष एवढी

तरतुद ठेवलेली आहे. तथापी वाढीव खर्च रू.7.00 लाख यासह तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदेनुसार साहित्य खरेदी करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-08 या शैक्षणिक वर्षाकरीता महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना गणवेश साहित्य (रेक्झीन व कॅनव्हॉस शुज प्रत्येकी एक जोड, पायमोजे रंगीत व पांढरे प्रत्येकी एक जोड व नेक टाय प्रत्येकी एक) याप्रमाणे पुरविण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदा धारक मे. अभय ट्रेडर्स, मे.एमआरव्ही इन्टरप्रायजेस, ओ.के.ट्रेडर्स, ओरंगाबाद, मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादीत, लिबर्टी शुज लि. यांच्या निविदा स्विकारण्यास तसेच विद्यार्थी संख्येनुसार साहित्य खरेदी करीता लागणाऱ्या वाढीव खर्च रू.7.00 लक्ष यासह एकूण र.रू.46,53,815/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 183 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, काळा दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी तिसऱ्या वेळेस बोलाविण्यात आलेल्या निविदांपैकी श्री.शेख मसुद यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराच्या 18.10% जास्त दराने करून घेण्यात येत असून सदरील कामाची मुळ निविदा रक्कम रू.5,97,026/- एवढी होती.(मुळ मंजूर रक्कम रू.8,45,465/- एवढी होती.) परंतु प्रत्यक्ष काम करतांना इन्टॅक या ऐतिहासिक वास्तुच्या संबंधी संस्थेच्या वास्तुतज्ञांनी प्रत्यक्ष स्थळावर सुचविलेल्या काही बदलांमुळे कामात काही अतिरिक्त बाबी होत असून यामुळे कामात रक्कम रू.10,78,187/- (निविदा रक्कमेशी तुलना करता) ची अतिरिक्त वाढ होत असून, त्यामुळे सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.16,75,213/- (म्हणजेच पुर्वीच्या मंजुरीपेक्षा 8,29,748/- एवढी वाढ होत आहे.) एवढी होत असून सदर कामावरील अतिरिक्त बाबींचे काम संबंधीत गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेस्तव आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामाच्या सुधारीत अंदाजपत्रक अतिरिक्त बाबींसह रक्कम रू.16,75,213/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काळा दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी वास्तुतज्ञांनी प्रत्यक्ष स्थळावर सुचविलेल्या काही बदलांमुळे कामात काही अतिरिक्त बाबींमुळे रक्कम रू.8,29,748/- वाढ होत असल्याने या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.16,75,213/- तसेच वाढीव काम अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ गुत्तेदार श्री. शेख मसूद यांचेमार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 184 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत स्वातंत्र्य सेनानी पद्मविभुषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचा पुर्णाकृती पुतळा महात्मा फुले चौक ते निरालाबाजार या मुख्य रस्त्यालगत सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या मालकी असलेल्या जागेतील उपलब्ध करून दिलेल्या जागेवर उभारणेच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभा दि.11.8.2006 ठराव क्र.323 अन्वये मंजुरी प्राप्त झाली होती. सदर पुतळ्यासाठी शासनाकडून रक्कम रू.10.00 लक्ष चा निधी एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त असून उर्वरीत 1 लक्ष रूपये महानगरपालिके मार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. असे एकूण रू.11.00 लक्ष रक्कमेचे काम मुळ गुत्तेदार श्री.उत्तम पाचारणे यांचेकडून करून घेण्याच्या प्रस्तावास स्थायी समिती सभा दि.16.8.2006 ठराव क्र.80 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली असून, तद्नंतर सदर पुतळा पैठणगेट येथील वाहतुक बेटात उभारणेच्या ठरावास सर्वसाधारण सभेने दि.20.7.2007 ठराव क्र.850/17 अन्वये मंजुरी दिली होती. त्यामुळे सदर पुतळा

उभारतांना स्थळबदल झाल्यामुळे व वास्तुतज्ञांच्या मार्गदर्शनानुसार पुतळ्याचा चौथरा बांधणे व परिसराचे सुशोभिकरण करणे यासाठी रक्कम रू.3,05,159/- ची अतिरिक्त वाढ झाली आहे. त्यामुळे सदर कामावर एकूण रक्कम रू.14,05,159/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली असून प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव पाठविण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी सदर कामाचे एकूण सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.14,05,159/- चे मुळ गुत्तेदार श्री. उत्तम पाचारणे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत स्वातंत्र्य सेनानी पद्मविभुषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचा पुर्णाकृती पुतळा उभारतांना स्थळबदल झाल्यामुळे व वास्तुतज्ञांच्या मार्गदर्शनानुसार पुतळ्याचा चौथरा बांधणे व परिसराचे सुशोभिकरण करणे यासाठी वाढीव रक्कम रू.3,05,159/- च्या अंदाजपत्रकास तसेच सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.14,05,159/- चे काम मुळ गुत्तेदार श्री. उत्तम पाचारणे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खान : 54 कोटीच्या कामाचे टेंडर किती वृत्तपत्रात दिले माहिती द्यावी. ई-टेंडरींग मध्ये काल काय झालेले होते पूर्ण माहिती द्यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : या सर्व कामाचे टेंडर रद्द करावे ही विनंती.

मा.सभापती :अति.शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : शहरामध्ये तीन कामाचे 55 कोटीच्या कामाची निवीदा 10 तारखेला ई-टेंडरवर अपलोड केली होती. 22 तारखेपर्यत दुपारी 3.00 वाजेपर्यत टेंडर भरण्याची वेळ होती. वेळ संपल्यानंतर 4.00 वा. ओपनींगची कार्यवाही सुरू झाली. त्यावेळी काही ठेकेदार टेंडर द्यायचे म्हणून पॉकीटसह आले. ई-टेंडरींग अपलोड झाले नाही टेंडर भरता आले नाही असे कारण दिले. दुसरे दोन ठेकेदार होते त्यांनी म्हटले की आम्ही टेंडरच भरले नाही. पहिल्या निविदेमध्ये चार टेंडर सेव झालेले होते.

श्री.संजय शिरसाट : ओपनींगच्या दिवशी वेळ संपल्यानंतर जे ठेकेदार टेंडर देण्यासाठी आले ते नेमके कुठले होते.

अति.शहर अभियंता : एक ग्रेट कन्ट्रक्शन म्हणून मुंबईचे ठेकेदार होते. दोन लोक औरंगाबादचे होते.

श्री.संजय शिरसाट : दुपारी दोन वाजेपर्यत टेंडर भरण्याची वेळ होती. अपलोड झाले नाही म्हणून टेंडर दु.4.00 वा. दोन तासात तो ठेकेदार महापालिकेत हजर होतो. शंका वाटते.

मा.आयुक्त :15 दिवसात त्यांनी टेंडर का भरले नाही माहिती नाही, परंतू ठेकेदार कुठलाही असो ते कोठुनही टेंडर भरू शकतात.

श्री.संजय शिरसाट : 54 कोटीचे टेंडर भरणारा व्यक्ती 15 दिवसात टेंडर भरणा करीत नाही शेवटच्या दिवशी शेवटच्या वेळेपर्यत अपलोड करीत असेल, टेंडर अपलोड होत नाही म्हणून भरता आले नाही असे म्हणून महापालिकेत दोन तासात येतो यात शंका येते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कालचे जे टेंडर आलेले आहे ते पुर्णतः रद्द करावे नव्याने टेंडर मागवावे. यात महापालिकेचे काहीही नुकसान होणार नाही.

श्री.अ.रशिद खान : एवढया मोठया रक्कमेच्या कामाचे टेंडर भरण्यासाठी 12 दिवसाचीच वेळ दिली. किमान 30 दिवसाचा अवधी द्यायला पाहिजे होता.शिवाय टेंडरची पब्लीसिटी झालेली नाही एकाच वृत्तपत्रात आलेले होते. लोकल येथील नागरीक मुंबईच्या वृत्तपत्रात काय आले माहिती घेतात. याचा अर्थ रिंग झालेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 25 हजारच्या कामासाठी रिटेंडर होते, 54 कोटीच्या कामासाठी का मागवू शकत नाही.

मा.सभापती : या कामाचा विषय या सभागृहासमोर येणार आहे यावर चर्चा करणे योग्य नाही.

श्री.अ.रशीद खान : वाईड पब्लीसिटी करावी मोठमोठया वृत्तपत्रात जाहिरात द्यावी. फक्त तीन लोकल वृत्तपत्रात सिटीजन्स, मुफस्सीर आण्खी एक वृत्तपत्रात आलेली आहे. पून्हा टेंडर काढावे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : तीन वृत्तपत्रात आले त्यातील दोन पेपर प्रिन्टींग होत नाही. कॉम्प्यूटरमध्ये एमबी काय सिस्टम असते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एकदा शंका आल्यास रिटेंडर करण्यास हरकत नसावी. ठेकेदारास वाचविण्यासाठी हे सर्व केलेले आहे असे वृत्तपत्रात आलेले आहे. वाईड पब्लीसिटी करावी रिकॉल करावे.

श्री.संजय शिरसाट : आताच जी वृत्तपत्राची नावे सांगितली त्यात जाहिरात दिली असेल तर याची दखल घेतली पाहिजे, कारण या वृत्तपत्राचे नाव मी पहिल्यादांच ऐकतो आहे.

मा.आयुक्त : ई-टेंडरींग मध्ये कुणीही गडबड करू शकत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : यापुर्वी अनेक वेळा टेंडर रिकॉल केलेले आहे. 54 कोटीच्या कामाचे टेंडर रिकॉल करावे स्थायी समितीची मान्यता होत आहे. मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकारात रद्द करावे.

श्री.संजय शिरसाट : ई-टेंडरींगमध्ये सुध्दा रिंग होत आहे. दोन वाजेपर्यत ॲडजेस्टमेंन्ट न झाल्यामुळे एक ठेकेदाराने तक्रार केली की माझी सही झालेली नाही. एकाने माझे टेंडर अपलोड झालेले नाही एवढे मोठे काम घ्यायचे, टेंडर भरतांना सही विसरते हे योग्य वाटत नाही.

मा.आयुक्त : कोणताही कागद कॉम्प्युटर मध्ये टाकायचा असल्यास त्याची प्रत घेतो ते कॉम्प्युटरमध्ये टाकतो. त्याची साईज किती आहे त्यास एमबी असे म्हणतो. असे गृहीत धरावे.

श्री.मो.जावेदमो.इसाक : फास्ट तसेच स्लो होण्याचे चान्सेस आहे. म्हणून काही लोकांचे टेंडर ॲक्सेप्ट झालेले नाही अशी माझी माहिती आहे.

मा.आयुक्त : स्पीड ही ज्या त्या संगणकावर अवलंबून असते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 54 कोटीच्या कामाचे टेंडर रिकॉल करावे. ई-टेंडरींग चांगले आहे की नाही.

मा.आयुक्त : याचा अर्थ ज्यांनी ऑब्जेक्शन घेतले त्याला काही महत्व द्यायला नको. काल जेंव्हा चार टेंडर आले ते कुणालाही माहित नव्हते. मी स्वत: अधिका-यांना आदेशीत केले की पत्रकारांना आपण नावे द्यावी मला सुध्दा माहित नव्हते.

श्री.संजय शिरसाट : पासवर्ड ज्यांचेकडे असते त्यांना माहित असेल आयुक्तांनाही माहित असण्याचे कारणच नाही.

मा.आयुक्त : पासवर्ड असून सुध्दा नावे असून मी आदेश देवून सुध्दा अधिकारी नाव देवू शकले नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ई-टेडरींग पध्दत चांगली आहे की नाही असेल तर वृत्तपत्रात का बदनामी होत आहे.

श्री.संजय सिरसाट :15 दिवसाचा कालावधी दिल्यानंतर वेळ संपल्यानंतर कुणाचेही ऑब्जेक्शन घेवू शकत नाही.

मा.आयुक्त : जेवढे न्यूज पेपर आहे त्यांना रोटेशन प्रमाणे ब्रेक करतो.

श्री.मो.जावेद मो.इसाक : दोन लोकांना काम मिळाले पुर्ण प्लॅनींग करून हे काम झालेले आहे. ई-टेडरींग चांगले आहे दुमत नाही परंतू मोठया रक्कमेचे काम आहे. लहान पेपरला आलेले आहे रिकॉल करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ई-टेडरींग बद्दल सभागृहाच्या वेगळया भावना नाहीत. परंतू काल जो प्रकार झालेला आहे त्या विषयी वेगळया बातम्या जनतेसमोर जात आहे. त्यासाठी सदर टेंडर रिकॉल करावे. यापेक्षा जास्त टेंडर येतील.

श्री.संजय शिरसाट : 25 कोटीच्या कामाचे टेंडर या शहरातील कुणीच भरले नाही असे होवू शकते का?

मा.आयुक्त : यात जे ए -1, बी-1 मध्ये जे 25 कोटीची कामे घेवू शकतात त्यांचेसाठीच होते. या सिस्टमवर इतकी खात्री आहे की ज्या कुणी एका व्यक्तीने भरले त्यांना सुध्दा माहित नव्हते की एकाच व्यक्तीने भरलेले आहे. ज्या लोकांनी टेंडर भरले नाही त्यांचे कारणे फारसे असू शकतात.

श्री. संजय शिरसाट : यात रिंग झाल्याचा प्रकार झाला हा आमचा आरोप आहे. जो दु.4.00 वा. आले माझे टेंडर अपलोड झाले नाही त्यांनी रिंग करण्याचा प्रयत्न केलेला आहे हा आमचा आरोप आहे.

मा.आयुक्त : त्यांना कळाले कसे, कूणी कूणी टेंडर टाकले.

श्री.संजय शिरसाट : कळाले कसे साधे गणीत आहे. ई-टेंडरीग जरी असेल तरी काम करणारे जे एजन्सीज आहे उदा. कच-यांच्या बाबतीत तीन एजन्सीच अपलोड करणार हे आपल्याला माहिती होते की नाही, माहिती होते. या कच-याच्या तीन एजन्सी या शहरात आहे हे आम नागरीकांना माहिती आहे. परंतू सदर व्यक्तीने यात रिंग करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 15 दिवसाच्या कालावधीनंतर जो कुणी येतो त्यांनी रिंग केलेली आहे. त्यांनी सुरूवातीपासूनच ॲप्रोज केलेले आहे. ज्यांनी कुणी बातमी दिली त्यांना त्यांनी प्रेशराईज केलेले आहे. म्हणून ज्या पेपरचे नाव माहित नाही अशा वृत्तपत्रात जाहिरात दिलेली आहे. त्यामागे काही तरी गुड होते हे आपण मान्य करायला पाहिजे.

मा.आयुक्त : जे मोठमोठे वृत्तपत्र आहे त्यास देण्यास काय अडचण होती माहिती घ्यावी लागेल.

मा.सभापती : मोठमोठया पेपरला टेंडरची जाहिरात का आलेली नाही हाच मुद्दा सभागृहाचा आहे.

डॉ.आशा बिनवडे : मोठमोठया पेपरला जाहिरात द्यावी. स्पर्धा होण्यासाठी रिकॉल करावे.

श्री.मो.जावेद मो.इसाक: लहान पेपरला जाहिरात दिली ही प्रशासनाची चूक आहे यात स्पर्धा झालेली नाही.

मा.आयुक्त : कोणत्याही कारणामुळे अपलोड करू शकले नाही तसेच जे कर्मचा-यावर आरोप होत आहे की, संगणक बंद केले अपलोड करू दिले नाही, हे चुकीचे आरोप होत आहे. या म्हणण्यावर रिकॉल करणार नाही. रिकॉल करावे असे म्हणणे बरोबर नाही लहान पेपरला जाहिरात दिली हे मान्य आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक: टेक्नीकल बाब आहे यात चूक होवू शकते.

मा.आयुक्त : लहान पेपरला जाहिरात दिली रिकॉल करू शकतो, परंतू सिस्टममध्ये चूक झाली म्हणून महापालिकेची बदनमाी करू नये.

श्री.संजय शिरसाट : लहान पेपरला जाहिरात का दिली त्यामागे कोण सुत्रधार आहेत याची पण चौकशी करावी.

मा.आयुक्त : जर न्युज पेपर निवडतांना चुक झाली नसेल रिकॉल करणार नाही, झाली असेल तर संबधीतावर कार्यवाही होईल. ज्या तीन वृत्तपत्रात जाहिरात आली ते कसे निवडले गेले याची चौकशी एक तासात करण्यात येईल.

श्री.अ.रशिद खॉन : 54 कोटीचे काम आहे वाईड पब्लीसिटी व्हायला पाहिजे की नाही.
मा.आयुक्त : वाईड पब्लीसिटी व्हायला पाहिजे.
श्री.अ.साजेद अ.सत्तार : रिकॉल करण्याचे मा.आयुक्तांना अधिकार आहेत. स्थायी समितीही आदेशीत करीत आहे सदर टेंडर रिकॉल करावे.
मा. सभापती : या बाबतीत प्रशासनाने चौकशी करावी व नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद